सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005**
**२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951**
**३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897**

**********************************************************************

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,**
**क्र.जि.आ.व्य/कावि/ ४१८ /2020.**
**पुणे, दिनांक :-१८ /03/2020.**

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेकरिता उपाय योजना करीत सेतु व महा ई सेवा केंद्र बंद करण्याबाबत

**आदेश**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, जागतिक आरोगय संघटनेचे कोरोना विषाणुला (COVID-१९) जगभरात पसरलेला साथीचा आजार म्हणुन घोषित केलेला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरुन पुणे शहरामध्ये व परिसरामध्ये परदेशातुन आलेले देशी विदेशी नागरीक, पर्यटक यामुळे सदर विषाणुचा प्रार्दुभाव पसरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सदरच्या कोरोना विषाणुपासुन संसर्ग फैलावण्याची शक्यता आहे. उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन सदर विषाणुचा व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी व अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी **पुणे जिल्हयातील सर्व सेतु व महा ई सेवा केंद्र पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवणेत येत आहेत. परंतु पुणे जिल्हयातील ज्या नागरीकांना दाखले अत्यावश्यक आहेत. सदर दाखल्याकरीता आवश्यक लागणारी कागदपत्रे त्यांनी स्कॅन करुन तहसिल कार्यालयाच्या ई-मेल वर पाठविण्यात यावीत त्यामुळे सर्व नागरीकांना ऑनलाईन पध्दतीने दाखले वितरीत करण्यात येतील.**

जिल्हाधिकारी
पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

**1.सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांना सुचीत करण्यात येते की आपल्या कार्यालयाच्या ई-मेल व्दारे प्राप्त होणारे अर्जावर तात्काळ ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करुन दाखले वितरींत करण्यात यावेत**
**2. तहसिलदार सर्वसाधारण शाखा**
**3. जिल्हा समन्वयक पुणे जिल्हा महाऑनलाईन लि.**

प्रत-

1. **मा. अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन,महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई**
2. **मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर**
3. **मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग , मंत्रालय मुंबई यांजकडे**
4. **आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
5. **पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड , पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण**

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, 7. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे**